*Appendix VI (i)*, **(Vide Article - 6.03)**

## <u>स्थाई आदेश</u>

क्रमांक कक्ष-१८/दक्षता/प्रक्र.२०४/२०००-०१/२१०,
नागपूर ४४०००६, दिनांक २२ मे २००१.

**विषय:- आगीपासून वनांचे संरक्षण करण्याबाबत...**

दरवर्षी वनक्षेत्रास लागणाऱ्या आगीमुळे वनक्षेत्राची हानी होते. अशा आगीत उभे वृक्ष, भू-पृष्ठावरील बीया, गवत आणि पुनउर्त्पत्ती नाश पावते, वनीकरण क्षेत्रास लागणाऱ्या आगीमुळे कित्येक वर्षाचे श्रम व पैसा नाश पावतो. विशेषकरुन आगीमुळे सागवान वृक्षास पोकळपणा निर्माण होऊन त्याचे मुल्य कमी होते व त्याचा परिणाम वाणिज्य तोटयावर होतो. आगीमुळे उभ्या वृक्षांना इजा होवून ते बुरशी व किटकांच्या प्रादुर्भावास बळी पडतात. लहान वन्यजीव आणि पक्षी तर नाश पावतात. स्थानिक आदिवासी व लोक जे त्यांच्या दैनंदिन निर्वाहाकरिता वनावर अवलंबून आहेत त्यांचेसमोर आगीमध्ये जळणाऱ्या जळावू, गवत, गौण वनोपजामुळे प्रतिकुल परिस्थिती उद्‌भवते. वनक्षेत्र अवनत होवून जमिनीतील सुक्ष्म जीव जंतू व ह्युमस नष्ट होते. जमिनीची जल शोषणाची व जल संग्रहाची क्षमता कमी होवून जमिनीची धूप व पुरांचे प्रमाण वाढीस लागते. याचा विपरित परिणाम जमिनीतील जल साठ्यावर होतो. एकुणच वनक्षेत्रास लागणाऱ्या आगीमुळे पर्यावरण संतुलन आणि वनाची परिस्थितीकीय प्रणाली विचलीत होते.

आगी ह्या नैसर्गिक आणि मानव निर्मित असतात. बहुतांश आगी ह्या मानव निर्मितच असतात. मानव निर्मित आगीची प्रमुख करणे अशी आहेत :-

| | |
|---|---|
| • स्वतःच्या निजी स्वार्थासाठी | मोहा फुले आणि तेंदुपत्ता संग्रहणांत सिमांतिक वाढ होण्यासाठी गावकरी/कंत्राटदार वनक्षेत्रास आगी लावतात. |
| • सुड भावनेतून | स्थानिक वनकर्मचारी जर अवैध वृक्षतोड व बेकायदेशिर वनचराईस प्रतिबंध करीत असेल तर त्याचा बदला घेण्यासाठी गावकरी अशी प्रथा अवलंबवितात. |
| • निष्काळजीपणा | गावकऱ्यांनी त्यांच्या वनालगतच्या शेतामध्ये शेतीची कामे करतेवेळी कचरा पेटवून आगीकडे दुर्लक्ष करणे, वनातून जातांना जळती विडी/सिगरेट फैकणे / कुपाचे काम झाल्यानंतर कुपातील मजुरांतर्फे काडीकचरा साफ न करण्यामुळे आगी लागतात. |

- अनुभव नसणाऱ्या वनकर्मचाऱ्याकडून — आग प्रतिबंधक उपाययोजना, जाळ रेषा घेणे किंवा राब जाळणे जर अनुभव नसणाऱ्या कर्मचाऱ्यांनी केलीत तर अनियंत्रित आगी लागु शकतात.
- चोरटी शिकार.
- वनक्षेत्रावरील अतिक्रमणे.
- वनक्षेत्रात आणि वनालगत कोळसा तयार करणे.
- पावसाळयामध्ये भरपूर गवत येण्यासाठी पावसाळ्यापूर्वी गावकऱ्यांकडून वनक्षेत्रास आगी लावणे.

आगीवर नियंत्रण ठेवण्यासाठी राबविण्यात येणारी कार्यप्रणाली सर्वंकष राहून त्यात खालील बाबींचा समावेश असावा.

१. आग प्रकरणाची योग्य चौकशी होवून निपटारा व्हावा.
२. आगीच्या घटनांना प्रतिबंध.
३. वनकर्मचाऱ्यांची कार्यक्षमता व जागरूकता उंचावणे.

## अ) आगीबाबतचे गुन्हे हाताळणे.

आगीबाबतची उपरोक्त संभाव्य कारणे वनअधिकाऱ्यांना ज्ञात असूनही ते आगीबाबत परिणामकारक प्रतिबंधात्मक उपाययोजना करीत नाहीत असे निदर्शनास आलेले आहे. आगीबाबतचे योग्य ते अभिलेख ठेवण्यात येत नाहीत. बहुतांश प्रकरणी आरोपी लापता-बेवारस अशा नोंदी घेवून ही प्रकरणे वर्षानुवर्षे प्रलंबित ठेवण्यात येतात. आगीबाबतचे वनगुन्हे परिणामकारक हाताळण्याच्या दृष्टीने खालील सूचना कडक अंमलबजावणीसाठी जारी करण्यात येत आहेत.

१.० परिक्षेत्र स्तरावरील गुन्हे रजिस्टरवरून मागील ५ वर्षातील आगींच्या घटनांचा तपशिल संकलित करण्यांत यावा. याकरिता कनिष्ट स्तरावरील वनकर्मचाऱ्यांच्या दैनंदिनीच्या आणि वनालगतच्या गावातील स्थानिक जनतेशी चर्चा करून आधारभूत माहिती गोळा करण्यात यावी. अशा प्रकारे संकलित होणाऱ्या माहितीच्या आधारे आगीच्या दृष्टीने अतिसंवेदनशिल / संवेदनशिल आणि सर्वसाधारण वनक्षेत्र वर्गीकृत करण्यांत यावे. अशा प्रकारचे निश्चित करण्यात आलेले वनक्षेत्र परिक्षेत्र स्तरावरील बिट नकाशात दर्शविण्यात यावे जेणेकरून प्रत्येक वनकर्मचाऱ्यास आग प्रणव क्षेत्राची स्पष्टपणे कल्पना येईल. यानुसार आगीच्या मोसमात अतिसंवेदनशिल आणि संवेदनशिल वनक्षेत्र वनअधिकाऱ्यांच्या नियंत्रणाखाली राहील जेणेकरून अशा क्षेत्रातील आगीचे एकही प्रकरण आवश्यक त्या

नोंदीपासून सुटणार नाही. उपलब्ध मंजूर अनुदानाच्या आधारे आग प्रतिबंधक कामासाठी अतिसंवेदनशिल क्षेत्रासाठी प्रथम अग्रक्रम देण्यात यावा. त्यानंतर संवेदनशिल क्षेत्रासाठी अग्रक्रम देण्यात यावा.

२.० १) वनक्षेत्रास आग लागलेली दिसताच किंवा आगीबाबतची माहिती प्राप्त झाल्यास सर्व स्थानिक वनकर्मचाऱ्यांनी पुरेसे मनुष्यबळ एकत्रिक करून आगीच्या क्षेत्राकडे धाव घेवून आग विझविण्याची कार्यवाही सत्वर करावी. आवश्यकता भासल्यास भारतीय वन अधिनियम, १९२७ चे कलम ६६ आणि कलम ७९ अनुसार अंमलबजावणी करावी. आग लागलेले प्रत्येक क्षेत्र २४ तासाच्या आंत किंवा आग आटोक्यात आल्यानंतर २४ तासापर्यंत बारकाईने तपासावे व आग पुन्हा भडकणार नाही याची खात्री करावी.

२) आग संपूर्णपणे विझविल्यानंतर आगीमुळे बाधित झालेल्या क्षेत्राचा सविस्तर असा पंचनामा तयार करण्यात यावा. त्यामध्ये बाधित क्षेत्र, कुप क्रमांक, वनखंड क्रमांक, मालाची नुकसानी झाली असल्यास त्याचे विवरण व किंमत, नैसर्गिक किंवा कृत्रिम पुनर्निर्मितीच्या रोपांना इजा पोहोचली असल्यास त्याचे विवरण, वन्यजीवांची हानी किंवा इतर कारणासाठी नुकसानी झाली असल्यास त्याचे विवरण दर्शविण्यात यावे तसेच त्यामध्ये आगीचे संभाव्य कारण, आग किती वाजता लागली, किती वाजता विझविण्यात आली आणि आग विझविण्याच्या दृष्टीने कशा प्रकारे कार्यवाही करण्यात आली याचा स्पष्ट उल्लेख असावा. आगीबाबत प्रथम गुन्हा अहवाल तात्काळ जारी करून पर्यवेक्षण अधिकाऱ्यास त्वरीत अवगत करण्यात यावे.

३) प्रत्येक आगीबाबतचा पंचनामा जवळच्या पोलीस स्टेशनला चौकशीकरिता पाठविण्यात यावा. मात्र, आगीबाबतची स्वतंत्र चौकशी वनअधिकाऱ्याद्वारा वेगळ्याने सुरू ठेवावी.

४) आगीबाबतचा अहवाल आणि पंचनामा प्राप्त होताच वनपाल किंवा त्यावरील वरिष्ठ वनअधिकाऱ्याने आगीमुळे बाधीत झालेल्या क्षेत्राची तात्काळ तपासणी करून पंचनाम्यात दर्शविलेल्या बाबींची तपासणी करावी व आरोपीबाबत चौकशी सुरू करावी. बाधित क्षेत्राची व्याप्ती आणि नुकसानीचे स्वरूप लक्षात घेता क्षेत्राची तपासणी कोणी करावी याबाबतचे निर्देश खालीलप्रमाणे आहेत.

अ) आगीमुळे जळालेले क्षेत्र २ हेक्टरपर्यंत असेल व नुकसानीची किंमत रूपये ५०००/- पर्यंत असेल तर अशा क्षेत्राची तपासणी संबंधित वनपाल किंवा त्यावरील

अधिकाऱ्याने करून पंचनाम्याची तपासणी माहिती मिळाल्यापासून <u>३ दिवसाचे आंत करावी व चौकशी पूर्ण करावी.</u>

ब) जर जळीत क्षेत्र २ हेक्टरपेक्षा जास्त असेल व नुकसानीची किंमत रूपये ५०००/- पेक्षा जास्त असेल किंवा रोपवनात आग लागलेली असेल तर असे क्षेत्र कमीतकमी संबंधित वनपरिक्षेत्र अधिकारी दर्जाच्या अधिकाऱ्याने तपासून पंचनाम्याची तपासणी करून चौकशीची कार्यवाही करावी.

क) जर नुकसानीची व्याप्ती रूपये १००००/- पेक्षा जास्त असेल व जळीत क्षेत्र ५ हेक्टरपेक्षा जास्त असेल तर अशा क्षेत्राची पाहणी उपवनसंरक्षकांनी स्वतः करावी अशा प्रकारणाची चौकशी संबंधित सहा. वनसंरक्षक हे करतील.

ड) आगीबाबतचे प्रत्येक प्रकरण, ज्यामध्ये नुकसानी रूपये ५०००/- पेक्षा जास्त आहे व जळीत क्षेत्र २ हेक्टरपेक्षा जास्त असेल किंवा काष्ठ आगारास आग लागलेली असल्यास अशा प्रत्येक प्रकरणाचा अहवाल वनपरिक्षेत्र अधिकारी हे सरळरित्या वनसंरक्षकांना सादर करतील. आगीचे स्वरूप व व्याप्ती लक्षात घेवून वनसंरक्षक हे आगीची काही ठिकाणे स्वतः तपासणी करण्याबाबतचा निर्णय घेतील व आगीची इतर ठिकाणे तपासण्याकरिता वनसंरक्षक हे त्यांच्या अधिनस्त असलेल्या राजपत्रित वनअधिकाऱ्यांना नियुक्त करतील.

ई) प्रत्येक आगीच्या प्रकरणांत, ज्यांत नुकसानीची किंमत रूपये ५००/- पेक्षा जास्त आहे, त्याचा अहवाल महालेखाकारांना सादर केला जाईल.

फ) आगीमध्ये जर वन्यजीवांची हानी निदर्शनास आली तर अशा घटनांचा तपशिल संबंधित वनपरिक्षेत्र अधिकारी सरळरित्या मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांना सादर करतील.

५) साधारणतः आगीबाबतच्या वनगुन्हे प्रकरणी आरोपीचा शोध घेणे अवघड आहे. तरी आगीच्या मोसमांत, अ-प्राधिकृत व्यक्तिंना, अनोळखी व्यक्तिंना वनक्षेत्रात प्रवेश करण्यांस मज्जाव करावा. आगीबाबतच्या वनगुन्हे प्रकरणी आरोपी आढळून आल्यास त्याचेविरूध्द भारतीय वन अधिनियम, १९२७ चे कलम २६ (१)(ब,क,ड,फ) आणि महाराष्ट्र (आगीपासून वनांचे संरक्षण) नियम १९८२ किंवा भारतीय वन अधिनियम १९२७ चे कलम ३३ (१)(ड) च्या तरतुदीनुसार प्रथम श्रेणी न्याय दंडाधिकारी यांच्या न्यायालयात खटला दाखल करावा. अशी प्रकरणे न्यायालयात लढवितांना भारतीय वन अधिनियम १९२७ चे कलम ६५ (अ) अन्वये सदर गुन्हा हा अजामीनपत्र आहे असे माननीय न्यायालयाच्या निदर्शनास आणून द्यावे.

३.० जर वनकर्मचाऱ्यांच्या निष्काळजीपणामुळे वनक्षेत्रात आग लागली असेल तर त्यांचेविरूध्द शिस्तभंग विषयक कार्यवाही सुरू करण्यात यावी.

४.० जर आग वनकामगार सहकारी संस्था किंवा तेंदू कंत्राटदार यांच्या अयोग्य कार्यपध्दतीमुळे आणि काडीकचरा साफ न केल्यामुळे लागल्याचे निदर्शनास आले तर त्यांचेविरूध्द करारनाम्याच्या शर्तीनुसार दंडात्मक कार्यवाही काटेकोरपणे बजाविण्यात यावी.

५.० प्रत्येक आगीच्या घटनांची नोंद ज्यामध्ये रूपये ५००/- पेक्षा जास्त नुकसानी झाली आहे, उपरोक्त परिच्छेद क्रमांक २ (२) च्या तपशिलासह, वनपरिक्षेत्र अधिकाऱ्याने वनखंड इतिहासमध्ये घेतलीच पाहिजे.

६.० प्रत्येक आगीच्या घटनेचा मासिक संक्षिप्त अहवाल, सोबत जोडलेल्या प्रपत्रानुसार (प्रपत्र-I) प्रधान मुख्य वनसंरक्षक, म.रा., नागपूर यांना सादर करण्यांत यावा.

ज्याप्रकरणी आरोपी आढळून आलेले नाहीत मात्र आगीमुळे झालेली नुकसानी निर्लेखित करणे आवश्यक आहे, अशी प्रकरणे सबळ खुलाशासह सक्षम अधिकाऱ्यांकडे आगीच्या घटनेच्या दिनांकापासून १ महिन्याच्या आंत सादर करण्यात यावी अशा प्रस्तावामध्ये खालील तपशिलांचा अंतर्भाव अवश्य असावा.

(अ) १) परिक्षेत्र, परिमंडळ, नियत्क्षेत्र, कुप क्रमांक, वनखंड क्रमांक, जळीत क्षेत्र आणि वनक्षेत्राचा वैधानिक दर्जा.

२) आगीच्या संदर्भात सदर क्षेत्र अतिसंवेदनशिल/संवेदनशिल/सर्वसाधारण आहे किंवा कसे,

३) बाधित क्षेत्राभोवती जाळ रेषा घेण्यात आल्या होत्या काय,

४) जाळ रेषांची तपासणी वरिष्ठ वनअधिकाऱ्यांनी केली होती काय? असल्यास केव्हा व कोणी केली.

५) फायर वॉचर नेमण्यात आले होते काय, केव्हापासून.

६) पोलीस स्टेशनला देण्यात आलेल्या तक्रारीची प्रत, पोलीसाकडील चौकशी अहवाल प्राप्त झाला असल्यास त्याची प्रत,

७) चालू आगीच्या मोसमांत बाधीत क्षेत्राचे निरीक्षण आग लागण्यापूर्वी व आग लागल्यानंतर ज्या वनअधिकाऱ्याने केले होते त्यांचे नांव व पद.

(ब) आगीबाबतची संभावित कारणे, आगीचा दिनांक व वेळ.

(क) आग विझविण्यांबाबत करण्यात आलेल्या उपाययोजना, आग पूर्णपणे केव्हा विझविण्यात आली, दिनांक व वेळ.

(ड) प्रथम गुन्हा अहवाल क्रमांक, दिनांक.

(ई) आरोपी आढळून आल्यास त्याचे नांव व पत्ता, त्यांचेविरूध्द करण्यात आलेल्या कार्यवाहीचा तपशिल, आरोपीस शोधण्यास पोलीसांची मदत घेण्यात आली होती काय.

(फ) आग जर वनकर्मचाऱ्यांच्या निष्काळजीपणामुळे, वनक्षेत्रात काम करणाऱ्या वन कंत्राटदार किंवा वनकामगार सहकारी संस्थाद्वारे लागल्याचे आढळून आल्यास त्यांचेविरूध्द केलेल्या कारवाईचा तपशिल.

(ग) आगीमुळे झालेल्या नुकसानीचा तपशिल (सोबतच्या प्रपत्र-२ अनुसार नुकसानीचे निदान करावे).

(ह) नुकसानी ज्या मुख्य लेखा शिर्षाशी निगडित आहे.

७.० साधारणतः असे आढळून येते की, आपल्याविरूध्द कारवाई होईल या भितीने आगीमुळे प्रत्यक्ष झालेल्या नुकसानीचा तपशिल स्थानिक वनकर्मचारी सादर करीत नाही, ही प्रथा बंद करण्यात यावी. मात्र, उपवनसंरक्षकांनी आगीमुळे झालेल्या नुकसानीचा अचूक आढावा घ्यावा असा आढावा घेतेवेळी त्यांनी व्यावसायिक दृष्टीकोन ठेवावा.

८.० वनगुन्ह्यांचा निपटारा करण्यास स्थायी आदेश क्रमांक ४२ अन्वये ७५ दिवसांचा कालावधी निर्धारित करण्यात आलेला आहे. आगीच्या वनगुन्हे प्रकरणी हाच कालावधी काटेकोरपणे पाळण्यात यावा.

## <u>(ब) आगीच्या वनगुन्ह्यांना प्रतिबंध घालणे.</u>

आगीच्या वनगुन्हे प्रकरणी योग्य वेळी कारवाई केल्यास पुढील अनर्थ टळू शकतो. केवळ आगीच्या मोसमांत आग प्रकरणाकडे लक्ष न देता संपूर्ण वर्षभर आगीच्या संकटाचा आढावा घेवून कार्यवाही आयोजिल्यास आग प्रकरणे कमी करता येवू शकतात.

१) आगीमुळे होणाऱ्या नुकसानीच्या दृष्टीने जनतेला जागरूक करणे:-

आगीमुळे जळावू इंधनाचा नाश, गवत आणि गौण वनोपजाचा नाश आणि प्रचलित अधिनियमानुसार आरोपी विरूध्द कारवाई करण्यास कोणत्या वैधानिक तरतुदी आहेत याची जाणीव स्थानिक जनतेला देवून त्याच्यामध्ये जागरूकता निर्माण करणे, हे कार्य स्थानिक वृत्तपत्रात जाहिरातीद्वारे, बाजाराच्या दिवशी घडी-पुस्तिकाचे वाटप, प्रमुख रस्त्यालगत उद्‌बोधनपर फलक, ग्रामपंचायत आणि शाळेच्या भिंतींवर माहिती रेखाटून करणे शक्य आहे.

आगीवर प्रतिबंध आणि नियंत्रण आणण्याच्या दृष्टीने संयुक्त वनव्यवस्थापनाच्या समित्या आणि वनसंरक्षण समित्यांना सक्रियरित्या सहभागी करण्यात यावे. या कार्यात वनालगत असणाऱ्या गावातील जनतेला जे वनापासून प्राप्त होणारे फायदे घेतात, सहभागी करून घेण्यात यावे. भारतीय वन अधिनियम १९२७ चे कलम ७९ च्या तरतुदी ग्रामस्थांच्या निदर्शनास आणून देवून त्यांचा सक्रिय सहभाग प्राप्त करून घ्यावा.

२) कार्य आयोजनेप्रमाणे वनक्षेत्राच्या बंद भागाचे सिमांकन ठळकपणे जमिनीवर करून घ्यावे जेणेकरून ग्रामस्थ अजाणतेपणे बंद भागात प्रवेश करणार नाहीत. वनविभागाकरिता ३० नोव्हेंबरपर्यंत आग प्रतिबंधक योजना तयार करण्यात यावी. ज्यामध्ये वर्ग-१, २ आणि ३ च्या वनक्षेत्राकरिता आयोजिल्या जाणाऱ्या उपाययोजना ठळकपणे नमुद कराव्यात. अशी योजना वनसंरक्षकांना सादर करण्यात यावी. सदर योजनेतील कोणत्या कामांना प्राधान्य द्यावे, त्यांची निश्चिती वनसंरक्षक निश्चित करतील व उपलब्ध मंजूर अनुदान व आगीच्या संदर्भात संवेदनशिल क्षेत्र लक्षात घेवून सदर योजनेस मंजूरी देतील. आग प्रतिबंधक योजनामध्ये खालील मुद्यांचा अंतर्भाव असावा.

I) दरवर्षी ३१ जानेवारीपर्यंत जाळ रेषा घेण्यात याव्यात व निरीक्षण मनोरे उभारण्यात यावेत. मात्र, पुरेसे मंजुर अनुदान उपलब्ध नसल्यास अतिसंवेदनशिल आणि संवेदनशिल क्षेत्रांचा प्रथम टप्प्यांत समावेश करावा. नैसर्गिक जाळ रेषा जास्तीत जास्त उपयोगात आणाव्यात. वनक्षेत्राची लहान लहान विभागांत विभागणी करण्यासाठी अंतर्गत जाळरेषा घेण्यांत याव्यात. कार्यआयोजनेप्रमाणे जाळरेषांचा आकार काटेकोरपणे ठेवण्यांत यावा. सुलभ संदर्भाकरिता जाळरेषांचा आकार खालीलप्रमाणे नमुद करण्यात येत आहे.

- ४० मिटर रुंद - वनाची बाह्य सिमा, आगाराकरिता इ.
- १० ते १३ मिटर रुंद - वनखंडाची सिमा.
- ५ ते ६.५ मिटर रुंद - कुपाची सिमा.
- १.५ ते ३ मिटर रुंद - सेक्शन सिमा.

जाळरेषेवरील गवत, लहान, झुडपांची कटाई डिसेंबर अखेरपर्यंत पूर्ण करावी आणि साधारणतः एक आठवड्यानंतर जाळ रेषा जाळून घ्याव्यात. हे कार्य कोणत्याही परिस्थितीत १५ फेब्रुवारीनंतर हाती घेण्यात येवू नये.

II) अतिसंवेदनशिल क्षेत्रात उंच ठिकाणी निरीक्षण मनोरे व उंच झाडावर मचाणी उभारण्यात याव्यात. वनक्षेत्रातील पाणस्थळे शोधून ठेवावीत जेणेकरून आवश्यकता भासल्यास अशा पाणस्थळांचा उपयोग होवू शकेल. पुष्कळशा वनविभागात बिनतारी संदेश यंत्रणा उभारण्यांत आलेली आहे. नियंत्रक अधिकाऱ्यांनी अशा यंत्रणेची नियमित तपासणी

करणे आवश्यक आहे. जेथे अशी यंत्रणा उपलब्ध नाही अशा ठिकाणच्या जवळच्या दूरध्वनी केंद्रांची माहिती कनिष्ट स्तरावरील वनकर्मचाऱ्यांना असावी. तसेच त्यांना वनपरिक्षेत्र / विभागीय कार्यालयाचे दूरध्वनी क्रमांक माहित असावेत.

iii) आग प्रतिबंधक उपाययोजनांचा आढावा विभागीय स्तरावर होणाऱ्या वनपरिक्षेत्र अधिकारी यांच्या मासिक सभेत, दरवर्षी डिसेंबर ते जून मध्ये होणाऱ्या सभेत, घेण्यात यावा.

iv) कॅलेंडर वर्ष संपताच उपरोक्त परिच्छेद अ (१) अन्वये तपशिलाच्या आधारे वनक्षेत्रास लागणाऱ्या आगीचा डाटा बेस तयार करण्यांत यावा. आगीमुळे होणाऱ्या नुकसानीचे चिकित्सक विश्लेषण करण्यांत यावे व तसा अहवाल प्रधान मुख्य वनसंरक्षक, म.रा., नागपूर यांचेकडे सादर करावा.

## (क) आगीबाबतच्या गुन्हे संदर्भात वैधानिक तरतुदी:

आगीबाबतच्या गुन्ह्यासंदर्भात वनकर्मचाऱ्यांना वैधानिक तरतुदीबाबत निटपणे प्रशिक्षित केले, तर अशी प्रकरणी हाताळण्यामध्ये त्याचे मनोधैर्य वाढू शकते. महाराष्ट्रामध्ये वनक्षेत्रास लागणाऱ्या आगीच्या संदर्भात कोणते अधिनियम/नियम प्रचलित आहेत त्याची माहिती खालीलप्रमाणे आहे.

१. भारतीय वनअधिनियम १९२७, कलम २६ आणि ३३.
२. महाराष्ट्र (आगीपासून वनांचे संरक्षण) नियम १९८२.
३. मुंबई वनसंहिता, खंड २, परिच्छेद १५२ ते १६५.
४. वन्यजीव (संरक्षण) अधिनियम १९७२, कलम ३०.
५. महाराष्ट्र गौण वनोपज अधिनियम १९६९ मधील करारनाम्यातील प्रचलित शर्ती.

उपरोक्त अधिनियम आणि नियमांतील असणाऱ्या तरतुदी आगीच्या हंगामापूर्वी वनकर्मचाऱ्यांच्या निदर्शनास कार्यशाळा, चर्चासत्राद्वारे आणून द्याव्यात.

## (ड) विभागीय लाकूड आगारातील सूचना:

१. आगारावरील वनकर्मचाऱ्यांना संदेश देवाण घेवाण पध्दतीची बिनतारी संदेश यंत्रणा, दूरध्वनीची सेवा (जवळचे दूरध्वनी केंद्र) अवगत असावी.
२. दोन मोठ्या गटांमध्ये पुरेशी जागा असावी.
३. आगारामध्ये अनाधिकृत व्यक्तिंना प्रवेश देवू नये.
४. आगारामध्ये पाणी, रेती किंवा अग्निरोधक उपकरण उपलब्ध असावे.
५. आगारातील रस्त्याच्या बाजू, गटाजवळील क्षेत्र नियमितपणे साफ करावे, वाळलेला कचरा, पाने गोळा करून दूर फेकावीत.

६. धुम्रपान करू नये अशा आशयांचे फलक आगारामध्ये योग्य ठिकाणी लावण्यात यावेत.

७. आगीच्या मोसमापूर्वी विद्युत तारा, वायरिंगचे जोड तपासावेत.

स्वाक्षरी/-
**मुख्य वनसंरक्षक (संरक्षण),**
**महाराष्ट्र राज्य, नागपूर.**

**प्रति,**
वनसंरक्षक (सर्व)
मुख्य वनसंरक्षक (सर्व)

**स्थाई आदेश**

**प्रपत्र - १**

**आगीच्या वनगुन्हे प्रकरणाचे मासिक प्रपत्र, विभाग ------------------**

| अ.क्र. | दिनांक व वेळ | | | आग ज्या क्षेत्रात लागली त्याचे वन परिक्षेत्र, पातन श्रेणी वनखंड क्र. कुप क्रमांक | जळीत क्षेत्राभोवती नियमानुसार आग प्रतिबंधक उपाय योजना घेण्यात आल्या होत्या किंवा कसे | आगीमुळे झालेली नुकसानी आणि अंदाजे किंमत |
|---|---|---|---|---|---|---|
| | आग लागण्याची | आग विझविण्याची | जळीत क्षेत्र (हेक्टर) | | | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |

| आगीचे संभाव्य कारण | आग विझविण्यासाठी केलेल्या उपाययोजना | आरोपीचा शोध घेण्यासाठी करण्यात आलेले प्रयत्न |
|---|---|---|
| ८ | ९ | १० |

**प्रपत्र -२**

**आगीमुळे झालेल्या नुकसानीचा आढावा घेण्यासाठीचे प्रपत्र**

| अ.क्र. | आगीमुळे झालेली नुकसानी | राखीव वनक्षेत्र (रूपये) | संरक्षित वनक्षेत्र (रूपये) | इतर वनक्षेत्रात (रूपये) |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १. | इमारती लाकुड (घमि.) | | | |
| २. | जळावू लाकूड (घमि.) | | | |
| ३. | बांबू (नग) | | | |
| ४. | गवत (क्विंटलमध्ये) | | | |
| ५. | रोपवने (हेक्टर) | | | |
| ६. | उभे वृक्ष (संख्या) | | | |
| ७. | नैसर्गिक पुर्नउत्पत्ती (हेक्टरमध्ये) | | | |
| ८. | कुरण क्षेत्र (हेक्टरमध्ये) | | | |
| ९. | प्रजातीवार वन्यप्राणी (संख्या ) | | | |
| १०. | वनविभागाची साधन सामुग्री | | | |
| ११. | एकूण | | | |